सातारा न्यूज
निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ
http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews

# कामगारांसाठी डिजिटल ढाल-सायबर सुरक्षा जागरूकता सत्र



**सातारा न्यूज;**
**सातारा :** डिजिटल युगात प्रत्येकाने इंटरनेटचा सुरक्षित वापर करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. ऑनलाईन व्यवहार, सोशल मीडियावरील माहितीची देवाण-घेवाण आणि कामकाजातील डिजिटल साधनांचा वापर करताना योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. याच उद्देशाने दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी, सुयश एंटरप्रायझेस, सैदापूर (सातारा) येथे सायबर सुरक्षा जागरूकता सत्र आयोजित करण्यात आले.या सत्रात कंपनीचे एच.आर. प्रमुख श्री. सचिन माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

सत्रामध्ये कंपनीचे कामगारांना थेट मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन कर्मवीर भाऊराव पाटील इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये (सातारा) यांच्या विद्यार्थिनी दिया सकुंडे व पूजा शिंदे यांनी, क्विक हील फाऊंडेशनच्या सहकार्याने केले.सत्राम ध्ये कामगारांना सायबर फ्रॉडची उदाहरणे, फिशिंग ई-मेल व बनावट लिंक ओळखण्याचे मार्ग, ऑनलाईन खरेदी व पेमेंट्समधील सुरक्षितता, तसेच सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या माहितीमुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनात सायबर धोके टाळण्यासाठी उपयुक्त माहिती मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. एस. सावंत, विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि श्रीमती पी. ए. लोखंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमामुळे उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण होऊन भविष्यातील सायबर जोखमींवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.